## 'ना.धों.महानोर आणि केदारनाथ सिंह यांच्या कवितेतील दुष्काळाचे चित्रण'



महेश रणदिवे
(संशोधक विद्यार्थी)
मराठी विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे
विद्यापीठ, पुणे.
दूरभाष : ९५०३६०७६७५

ना.धों.महानोर आणि हिंदी कवी केदारनाथ सिंह हे दोन्ही कवी ग्रामीण आहेत. दोन्ही कवींचा जन्म ग्रामीण भागात विशेषत: शेतकरी कुटुंबात झाला असल्यामुळे दुष्काळाची दाहकता दोन्ही कवींनी अनुभवलेली आहे. आपल्या भारत देशाला दुष्काळ हा नवा नाही. अलीकडे तर त्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढते आहे. त्यामुळे संबंध ग्रामजीवन होरपळून निघत आहे. याचे चित्रण अनेक कवींनी आपआपल्या परीने केलेले आहे. ना.धों. महानोर आणि केदारनाथ सिंह यांच्या कवितेतूनही दुष्काळाचे चित्रण मोठ्या प्रमाणात आलेले आहे. त्यांच्या कवितांतून आलेले दुष्काळाचे चित्रण महत्त्वाचे आणि अंतर्मुख होऊ न विचार करायला लावणारे आहे.

दुष्काळामुळे रानाची, जनावरांची, गावची वाताहात झाली आहे. हे प्रखर वास्तव मांडताना कवी महानोर लिहितात.

> '' आभाळ भरुन येते पुष्कळ
> पहिल्यासारखी बरसात नाही
> नक्षात्रामागून नक्षत्रे सरतात
> तरीही मृदगंध दरवळत नाही ''[१]

एकेकाळी प्रचंड पडणारा पाऊस आता हुलकावणी देतो आहे. चालू नक्षत्रात पाऊस नाही पडला तर पुढच्या नक्षत्रात पाऊस नक्की पडेल असा शेतकरी मनामध्ये आशावाद ठेवतात. पण सर्व नक्षत्रे संपली तरी पाऊस पडत नाही. त्यामुळे शेतकऱ्याची व पावसावर अवलंबून असणाऱ्या सर्वच घटकांची दयनीय अवस्था होते. एक काळ असा होता. कुठे आभाळ भरून आले तर त्या आभाळाची शेतकऱ्याला धास्ती लागायची कारण पाऊस आला-आला म्हणे पर्यंत सर्वत्र पाणी-पाणी करून टाकायचा त्यामुळे नदी, ओढे, नाले, तळी तुडुंब भरून वाहायची. या पावसामुळे खेडयात, रानात, निसर्गात चैतन्य होते. पण आता हे चैतन्य लोप पावत चालले आहे. दुष्काळामुळे पाण्याची भीषण टंचाई जाणवते आहे. पिण्यासाठी पाणी मिळत नाही, शेतातील पीकांना पाणी मिळत नाही. वर्षानुवर्ष दुष्काळ पडत असल्यामुळे पाण्याची पातळी खालावत चालली आहे. ही खंत व्यक्त करताना कवी लिहितात.

> ''विहिर कोरडी झाली
> मुलासारखी जोपासलेली
> फळबाग डोळयांनी जळताना पाहिली''[२]

पोटच्या मुलाप्रमाणे शेतकऱ्याचे शेतीवर, शेतातील पीकांवर प्रेम असते. जेव्हा प्रचंड असा दुष्काळ पडतो. तेव्हा पाण्याविना दाही दिशा होतात. पीकांना पाणी मिळत नाही. पीके पाण्याअभावी जळून जातात. या पीकांना वाचवण्यासाठी शेतकरी काहीच करू शकत नाही. ज्या पीकांच्या आधारावर भविष्यांचे नियोजन केलेले असते. तेच पीक डोळयांदेखत जळून गेल्यामुळे शेतकऱ्याच्या दुःखाला पारावर राहत नाही हे दुःख केवळ मातीचे नाही, पीकाचे नाही तर संबंध शेतकरी समूहाचे ते दुःख आहे.

> ''तळे चांदण्याचे डोहाळून गेले
> डोहाळून गंगा नि गोदावरी''[३]

प्रचंड पडणाऱ्या पावसामुळे गंगा, गोदावरी या नदया बारमाही भरून वाहत असत. पण आता सदैव पडणाऱ्या दुष्काळामुळे त्यांची दुर्दशा झाली आहे. कायम वाहणाऱ्या या नद्या आता डबघाईला आल्या आहेत. छोटया नद्या तर पावसाळयातच कोरडया पडत आहेत. त्यामुळे तीव्र दुष्काळात तहान भागविण्यासाठी रान, जनावरे, पक्षी, माणसे व्याकूळ होत आहेत. भयाण अशा दुष्काळामुळे लोक ज्या ठिकाणी पाणी व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध होतील अशा ठिकाणी गाव सोडून वास्तव्यास जात आहेत. त्यामुळे गावाचे गावपण जाऊन गाव ओस पडत आहे.

> ''स्वातंत्र्य आलं
> सुखाचं हिरवेपण

> “ना.धों.महानोर आणि केदारनाथ सिंह यांच्या कवितांतून दुष्काळाचे चित्रण सहजतेने आलेले आहे. त्यामुळे ते वाचकाचे लक्ष वेधून घेते आणि वाचकाला विचारप्रवण बनविते. कवी ना.धो.महानोर आपल्या कवितेतून दुष्काळाच्या समस्या मांडतात त्याचबरोबर दुष्काळ दूर व्हावा यासाठी दयाघन आभाळाकडे तसेच ईश्वराकडे ते प्रार्थना करतात. केदारनाथ सिंह मात्र दुष्काळामुळे निर्माण झालेल्या समस्या मांडतात. पण दुष्काळ दूर होण्यासाठी ते आभाळाकडे किंवा ईश्वराकडे प्रार्थना करताना दिसत नाहीत. असे जरी असले तरी दोघा कवींचा दृष्टीकोन भारत देशातील दुष्काळ दूर व्हावा आणि पूर्वीचे गतवैभव प्राप्त व्हावे हाच आहे.”

REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA

शहाराला गेलं
शेतीच्या आयुष्याला
गाडगं-मडकं आलं''[४]

दुष्काळामुळे गावात रोजगार नाही म्हणून अनेक लोक रोजगाराच्या शोधात शहरात आले. शहरात वेगवेगळे उद्योग करू लागले त्यामुळे शहरे फुगली, शहरांचा विकास झपाटयाने झाला. राजकीय लोकांचेही लक्ष शहरामध्येच जास्त राहिले. त्यामुळे सुखाचे हिरवेपण शहराला गेले. गावची झालेली ही अवस्था कवी महानोरांनी अचूक शब्दात उपरोक्त कवीतेतून व्यक्त केली आहे. स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्ष उलटून गेली. तरीही शेतकरी या सुलतानी आणि आस्मानी संकटामुळे दुःखीच आहे. यामुळे महानोरांची कविता हळहळ व्यक्त करते.

''उभ्या धस्कटाचं रान आयुष्याला भिंगुळवाणं
मुक्या जात्याच्या पाळूशी ओवी गाते प्राणातून''[५]

कितीही भयाण दुष्काळ पडला तरी रानावर प्रचंड जीव असल्यामुळे रान सोडून न जाणाऱ्या आणि जात्याच्या पाळूशी गीत गाणाऱ्या शेतकरी स्त्रीचे दुःख कवीने वरील कवितेतून व्यक्त केले आहे. भयाण अशा दुष्काळामुळे आधी जे पीक घेतले ते नांगरण्यासाठी पैसे नाहीत म्हणून ते रान धस्कटासहित तसेच आहे. जात्यावर दळण दळण्यासाठी धान्य नाही त्यामुळे मोकळया जात्या जवळ स्त्री गाणे गात बसते आणि आपल्या दुःखाला वाट मोकळी करून देते. स्त्रीचा दुष्काळातही असणारा जीवनसंघर्ष कवीने समर्पकपणे व्यक्त केला आहे.

कवी महानोरांना शेतीचा पशू-पक्षी, झाडे-झुडपे यांचा लळा असल्यामुळे त्यांचे दुःख निवारण होण्यासाठी, सगळी सृष्टी चैतन्यमय होण्यासाठी कवी दयाघन आभाळाला पाऊस पाडण्यासाठी प्रार्थना करतो. तसेच कुणब्याचा मळा पूर्वीसारखा बहरण्यासाठी आणि पाखरे आनंदाने डौलण्यासाठी ईश्वरालाही साकडे घालतो.

''येऊ देगा पीकपाणी
जन्म दुःखाच्या कारणी
सोनसळी मातीतला
गंध भरू दे आस्मानी''[६]

दुष्काळ नष्ट होण्यासाठीची कवीची तळमळ आणि त्यासाठीचा आशावाद उघडपणे त्यांच्या दुष्काळविषयक अनेक कवितांतून प्रकट होतो.

ना.धों. महानोरांप्रमाणेच केदारनाथ सिंह यांच्या कवितेतून दुष्काळाचे चित्रण वास्तवपणे येताना दिसते. भारतीय शेती पावसावर अवलंबून आहे. पाऊस पडला तरच शेती चांगली पिकते व शेतकरी आनंदाने जीवन जगतात पण अलीकडच्या काळामध्ये पर्यावरणाची हानी मोठया प्रमाणात होत असल्यामुळे दुष्काळाची दाहकता दिवसेंदिवस वाढत आहे. पूर्वी दहा-पधरा वर्षांतून एकदा दुष्काळ पडायचा आता सलग वर्षांनुवर्ष एका पाठीमागे एक असे भयंकर दुष्काळ पडत आहेत. त्यामुळे समाजीवनात हतबलता निर्माण झाली आहे, याचे चित्रण करताना केदारनाथ सिंह लिहितात.

''भयानक सुखा है
पक्षी छोडकर चले गये है
पेडों को
बिलों को छोडकर चले गये है चींटे
चीटियाँ
देहरी और चौखट
पता नही कहाँ-किधर चले गये है
घरों को छोडकर''[७]

भयाण अशा दुष्काळामूळे प्राण्यांच्या, पक्षांच्या जीवनात झालेले कवीने मांडलेले बदल वाचकाच्या अंगावर शहारे उभे करतात. दुष्काळामुळे एकेकाळी आनंदाने एकाच ठिकाणी दीर्घकाळ राहणारे पक्षी झाडे, घर सोडून अन्नाच्या शोधात भटकत आहेत. मुंग्याही आपले घर सोडून निघून गेल्या आहेत. कवी जेव्हा पक्षांची रिकामी घरटी पाहतो, मुंग्यानी जमिनीत राहण्यासाठी केलेली बिळे उदास पाहतो तेव्हा कवीचे मन दुःखाने भरून येते. हे दुःख कवीने उपरोक्त काव्य ओळीतून व्यक्त केले आहे.

दुष्काळामुळे निर्माण झालेल्या विदारक स्थितीमुळे आणि होत असलेल्या त्रासामुळे मुलगा वडिलांना पडलेल्या दुष्काळाविषयी विचारतो तेव्हा वडील सांगतात.

''कहते है पीता
ऐसा अकाल कभी नही देखा
ऐसा अकाल कि बस्ती में
डूब तक झूलस जाए
सूना नही कभी डूब मग मरती नही
कहते हैं वे
और हो जाते है चूप''[८]

या कवितेतून कविने पूर्वीपेक्षा सध्याच्या दुष्काळाची भयानकता वडील आणि मुलगा यांच्या संवादातून स्पष्ट केली आहे. आतापर्यंत पडलेले दुष्काळ अनुभवले, ऐकलेही पण असा दुष्काळ कधीही अनुभवला नाही या वडिलांच्या सल्ल्यावरून दुष्काळाची तीव्रता वर्षानुवर्ष वाढत असल्याची साक्ष पटते.

''अचानक एक बुढीया ने उन्हें देखा
जरूर जरूर वे पाणी की तलाश में आये
उसने सोचा
वह रसोई में गयीऔर अंगन के बीचों बीच
लाकर रूक दिया
एक जलभरा कटोरा''[९]

दुष्काळामुळे पाण्याच्या शोधात आलेल्या 'सारस' पक्षाला पाहून एक स्त्री त्याला पिण्याच्या पाण्याची पान नं. १७



REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA

भाषांतर, लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्र. आ. जुलै १९९२, पृ. क्र. ९२ ५. [illegible]
प्र. आ. जुलै १९९२, पृ. क्र. ०२

**पान ६ वरुन** या दोन संतांशिवाय बालबोधकार ष्यंबकराज, वामनपंडित, दिनकरस्वामी इत्यादी संत परंपरेतील विद्वानांनी या संप्रदायाविषयी निर्भर्त्सनापूर्वक उद्‌गार काढलेले आहेत. ''चक्रधरांच्या नंतर सुमारे ६०-७० वर्षांनी मात्र मराठीतील महानुभावीय गद्य-पद्य भांडार 'सकळ', 'सुंदर' इ. लिपींच्या कडीकुलपात बंदिस्त झाले आणि सुमारे सातशे वर्ष मराठी समाज त्यापासून वंचित राहिली.''५ अशा बंदिस्तपणामुळेही महानुभाव तत्त्वज्ञानाविषयी, वाङ्‌मयाविषयी व आचारधर्माविषयी समाजात विविध गैरसमज प्रचलित झाले. परिणामी वारकरी संप्रदायाप्रमाणे महानुभाव संप्रदाय महाराष्ट्र धत बहुजन समाजातील तळागाळापर्यंत पोहोचू शकला नाही. याचे कारण महानुभावांचे विक्षिप्त, विरक्त व काहिशी विकृत वाटणारी आचारसंहिता हेच आहे.

■

संदर्भ : १. अ. ना. देशपांडे, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला, व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी १९९५, पृष्ठ - ४०२. २. डॉ. र. रा. गोसावी, 'पाच भक्तिसंप्रदाय', प्रतिमा प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, १५ ऑगस्ट २००८, पृष्ठ १२८. ३. तत्रैव ; पृष्ठ १३०-१३१. ४. तत्रैव; पृष्ठ १३३ ५. ल.रा. नसिराबादकर, ''प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,'' फडके प्रकाशन, कोल्हापूर, सातवी आवृत्ती २००१.

**पान १४ वरुन** सोय करते, पण त्या पाण्याकडे त्याचे लक्ष जात नाही. त्यामुळे ती स्त्री दुःखी होते दुष्काळात ही माणसे पक्षांवर जीवापाड प्रेम करतात. ती त्यांना विसरत नाहीत हे कवीने एका 'स्त्रीच्या' उदाहरणावरून स्पष्ट केले आहे. यावरून मानवीय संवेदना प्रकट होते.

ना.धों.महानोर आणि केदारनाथ सिंह यांच्या कवितांतून दुष्काळाचे चित्रण सहजतेने आलेले आहे. त्यामुळे ते वाचकाचे लक्ष वेधून घेते आणि वाचकाला विचारप्रवण बनविते. कवी ना.धो.महानोर आपल्या कवितेतून दुष्काळाच्या समस्या मांडतात त्याचबरोबर दुष्काळ दूर व्हावा यासाठी दयाघन आभाळाकडे तसेच ईश्वराकडे ते प्रार्थना करतात. केदारनाथ सिंह मात्र दुष्काळामुळे निर्माण झालेल्या समस्या मांडतात. पण दुष्काळ दूर होण्यासाठी ते आभाळाकडे किंवा ईश्वराकडे प्रार्थना करताना दिसत नाहीत. असे जरी असले तरी दोघा कवींचा दृष्टीकोन भारत देशातील दुष्काळ दूर व्हावा आणि पूर्वीचे गतवैभव प्राप्त व्हावे हाच आहे.

■

**संदर्भ आणि टीपा :** १. महानोर ना.धों. ''पावसाळी कविता,'' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८२, पृ.४९. २. महानोर ना.धों. ''गंगा वाहु दे निर्मळ'' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८२, पृ.५७. ३. महानोर ना.धों. '' पानझड'' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९७, पृ.०६. ४. महानोर ना.धों. '' प्रार्थना दयाघना'' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९० , पृ. ११ ५. तत्रैव, पृ.१०. ६. महानोर ना.धों. '' पानझड'' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९७, पृ.४७. ७. अज्ञेय(संपा.), ''वही,' भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, नई दिल्ली, १९८४, पृ.२०. ८. सिंह केदारनाथ, '' अकाल में सारस'' राजकमल प्रकाशन, न दिल्ली, १९८८, पृ.२०. ९.सिंह केदारनाथ, '' अकाल में सारस'' राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, १९८८, पृ.२२,२३.